MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2019
Issue-29, Vol-03

Date of Publication
30 Jan. 2019

Editor
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

T.C.
Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist.

56

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

Jan. To March 2019
Issue-29, Vol-03

0110

28

# ...व्यवस्थापनामध्ये सिक्स सिग्मा ...चे महत्व- एक अध्ययन

डा. पवार जी. आर.
ग्रंथपाल
...शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

सार :
प्रस्तुत शोधनिबंधात सिक्स सिग्मा या तंत्राची माहिती देण्यात आली आहे. सर्वप्रथम प्रस्तावना व्याख्या,उदिस्टे,सिक्स सिग्मा पध्दती सिक्स सिग्माची सुत्रे सिक्स सिग्माची वापर कशासाठी करावा हे सांगण्यात आले आहे. त्यानंतर सिक्स सिग्मा आणि ग्रंथालय , सिक्स सिग्माचे फायदे ,आवश्यकता ,पाय-या, सिक्स सिग्माचे सुत्रे इ. चा अभ्यास या संशोधनात केला जाणार आहे.

## प्रस्तावना

क्वालिटी या शब्दाचा अर्थ गुणवता आहे. पण आपण संरक्षण करणे किंवा एक सेवा काय गुणवतेची आहे. असे न म्हणता काय त्यांचा दर्जा आहे असे आपण म्हणतो अनेक राष्ट्रीय कंपन्याच्या बरोबरीचे उत्पादन त्यांना सेवा देणे आज महत्वाचे झाला आहे. त्यामुळे ते राबविने अतिशय कठीण झाले आहे.मोटोरोला ही जगातील कंपनी या सिक्स सिग्मा कामगिरीसाठी प्रसिध्द झाली आहे.

ब-याच कंपनीमध्ये आपल्या कंपनीचा उत्पादनाचा दर्जा वाढविण्यासाठी कंपनीमध्ये काम करणारे सर्वच कर्मचारी वर्ग मालक आणि व्यवस्थापक यांची मनापासुन काम करण्याची इच्छाशक्ती असावी लागते. तरच आपल्या कंपनीचा दर्जा उंचावतो कंपनीमध्ये कोणत्याही प्रकारचे दोष आढळु नये त्या करीता सर्वांनी काळजी घ्यावी लागते. जर दोष आढळल्यास ती वेळीस टाळणे आवश्यक आहे.स्पर्धात्मक युगात आपला दर्जा टिकुण ठेवण्यासाठी जास्तीत जास्त मेहनत आणि काळजी घ्यावी लागते. आपण सर्वांना पुर्णपणे सेवा देऊ शकत नाही तरी पण ९९.९९ टक्के अचुकता असणे आवश्यक आहे. आणि ही अचुकता म्हणजे सिक्स सिग्मा होय.

## शोध निबंध लेखनाचा उद्देश

१) सिक्स सिग्मा प्रणाली विषयी जाणुन घेणे.

२) सिक्स सिग्मा प्रणालीच्या पाय-या,सुत्रे व त्याचे लाभ या विषयी जाणुन घेणे.

३) सिक्स सिग्मा प्रणालीचे ग्रथालय व्यवस्थापनामधील महत्व जाणुन घेणे.

## सिक्स सिग्माचा इतिहास

१९८० मध्ये सिक्स सिग्मा या प्रणालीचा वापर अमेरीकेतील मोटोरोला या मोबाईल कंपनी जपानी लोकासोबत असलेल्या व्यावसायिक स्पधेमुळे कंपनीचा व्यवस्थापकीय दर्जा सुधारण्यासाठी या कंपनीने केला. १९८७ मध्ये मोटोरोला या कंपनीच्या संदेशवहन विभागात एका नविन पध्दतीचा उगाम झाला. त्याला सिक्स सिग्मा या नावी ओळखु लागले १९८० साली या प्रणालीला सिक्स सिग्मा म्हणतात.हे माहित नव्हते सिक्स सिग्मा या पध्दतीचा वापर केल्यामुळे मोटोरोला या कंपनीने आपले अपेक्षित ध्येय गाठले. ते सुरु वातीला खुप कठीण वाटत होते. १९८७- १९९७ या कालावधीत कंपनीच्या उत्पादन विक्रित ५ पटीने वाढ झाली त्यावेळी नफा हा केवळ २० टक्के प्रती वर्षान वाढला.

## सिक्स सिग्माचा अर्थ

१) सिक्स सिग्मा म्हणजे प्रक्रियेतील दोष दुर करुन ग्राहकांच्या अपेक्षा व वैशिष्टयानुसार वस्तुसेवा पुरवणारी पध्दती होय.

२) एखादया प्रक्रियेतील दोष ओळखुन पध्दतशीररीत्या दोष दुर करणे व एक परीपुर्ण उत्पादन तयार करणे व हे करताना साख्यकिय पध्दतीचा अवलंब करणे म्हणजेच सिक्स सिग्मा होय.

३) जेव्हा एखादया कार्यप्रणालीची अचुकता ९९-९९ टक्के एवढी असते तेव्हा त्या कार्यप्रणालीला सिक्स सिग्मा असे म्हणतात.

४) एखादया प्रक्रियेतील त्रुटी ओळखणे आणि त्यांची वारंवारता विलक्षणरित्या कमी करुन भविष्यात ती प्रक्रिया बिनचुक होईल यांची हमी देणे म्हणजे सिक्स सिग्मा होय.

५) A business process that allows organizations to drastically improve their bottom line by designing and monitoring every day business activities in ways that minimize waste and resources while increasing customer satisfaction.

## सिक्स सिग्मा प्रणालीची उद्दीष्टे

१) उच्च प्रतीचे गुणवत्ता वाढविणे.

२) उत्पादन जास्त वाढवुन त्याची जास्तीत जास्त प्रमाणात विक्री करणे.



T.C.
Assistant Librarian
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli (M.S.)

PRINCIPAL

३) उत्पादन करते वेळेस झालेल्या चुका दुरुस्त करणे.
४) त्यामध्ये अचुकता आणण्यासाठी प्रयत्न करणे
५) आपण केलेल्या कामाचा दर्जा वाढविणे.
६) हा दर्जा कायम टिकुन ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.

**सिक्स सिग्माची पाय-या**

१) अंतरभुत करणे प्रकल्पाची व्याप्ती व उद्देश ठरविणे अधिकारपत्र अंतरभुत करणे अडचणीच्या प्रक्रियाचा नकाशाचा शोध घेणे व ग्राहकांची मागणी ठरविण्यासाठी ग्राहकांचे वर्गीकरण करणे.
२) माहिती गोळा करणे दोषाची मुळ माहिती व ईतर शक्य कारणाची मुळ माहितीची रचना करणे. सद्या परिस्थिती विषयक सबंधीत माहिती गोळा करणे व सिक्स सिग्मा क्षमतेचे स्तर मोजणे.
३) दोष शोधणे दोषाची मुळ कारणे ठरविणे शोध घेणे व त्यांना एकसंघ करणे.
४) सुधारणा व मोजमाप मुळ दोष दुर करण्यासाठी आमलात आणलेल्या उपायांची सुधारणा व नंतर मोजमाप करणे व अपेक्षित असलेल्या परिणामासाठी वर्गीकरण करणे.

सिक्स सिग्मा प्रणाली एखादी गोष्ट कित्येक दिवसापासुन चालु असते. तीच परंपरा ठेवण्याची मानवी प्रवृती असते. खुप त्रास होऊ लागला की आपण त्यावर उपाययोजना करुन जी गोष्ट समोर ढकलतो. पण ती चुक कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी फारसे प्रयत्न होत नाही तर ती गोष्ट गंभीर स्वरुप धारण करते. काही दिवसानी उत्पादनाचा दर्जा ढासाळतो आणि कंपनीला त्यांच्या यशापासुन मुकावे लागते.किंवा वंचित रहावे लागते.सिक्स सिग्मा प्रणालीचा अवलंब केल्यास स्पर्धात्मक युगात टिकुन राहता येते.

**सिक्स सिग्माचे सुत्रै**

१) रिवाईडिंग रिलेशनशिप एखादया संस्था किंवा कंपन्यामध्ये काम करणा-या अनेक कर्मचा-यामध्ये परस्पर त्यांचा मधील संबंध कसा आहेत हे जाणुन घेवुन त्यांच्यातील परस्पर संबंधामध्ये संवाद प्रस्थापीत करणे संस्था/कंपनीमधील वातावरण आनंदी व उत्साही बनविणे.
२) यशस्वी सवयी मोठ मोठ्या संस्था शाळा कंपनीमध्ये अनेक शाखा उपशाखा असतात. त्यामध्ये काम करणारे अनेक कर्मचारी हे वेगवेगळया स्वभावाचे वेगवेगळ्या सवयी असणारे कर्मचारी असतात. वाईट व्यसन असणारे आळशी व्यक्तीना सुधारण्यासाठी त्यांच्या सवयी बदलण्यासाठी त्यांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी सिक्स सिग्मा प्रणालीचा वापर करणे योग्य ठरते.
३) तंदुस्त शरीर कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी व तेथील यंत्रना व्यवस्थित असेल तर कंपनीचा विकास होऊ शकतो. म्हणुन कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी व यंत्रणा चांगली असणे आवश्यक आहे तरच कंपनीचा विकास होऊ शकतो.
४) शार्पर सेन्सेस कंपनीमध्ये कोणत्या प्रकारची बदल किंवा सुधारणा असेल तर ती कर्मचा-यापर्यंत पोहचवेल अशी व्यवस्था करावी.जी सुधारणा करायची आहेत त्या विषयी कर्मचा-याशी चर्चा करावी.
५) प्लेझन्ट इमोशन्स कर्मचारी ज्या कंपनीत काम करतात त्या ठिकानचा परिसर स्वच्छ व निर्मळ असावे एखादया कर्मचा-यानी चांगले काम केल्यास त्यांना शाबाशकी दयावी कारण त्यामुळे त्या कर्मचा-याचा मनोबल उच्चावेल कंपलीमधील यंत्रणा दोषमुक्त ठेवावे.
६) नियञित मन कंपनीमध्ये काम करणा-या कर्मचारी हा निरोगी असला पाहिजे कारण तो शांत मनाने काम करेल जर तो व्यसनी किंवा वाईट सवयीचा असेल तर काम करणार नाही. जर तो शांत व समाधानी असेल तर जास्त कार्यक्षमतेने काम करेल. वाईट सवयी पासुन दुर राहिल व त्यामुळे कंपली मोठया प्रमाणे उत्पादन वाढेल त्यामुळे कर्मचा-यानी आपल्या मनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**सिक्स सिग्मा आणि ग्रंथालय**

आजचे युग हे माहितीचे युग आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे माहितीच्या विस्फोटामुळे प्रचंड प्रमाणात जी माहिती विविध ठिकाणाहुन निर्माण होत आहे. त्या माहितीचा संग्रा करणे आणि तो माहिती गरजु व्यक्ती पर्यत पोहचविणे हे काम जिकीरीचे होत चाललेला आहे. माहिती तंञज्ञानाच्या युगात पारंपारीक ग्रंथालय हे नामशेष होत चालेला आहे. ग्रंथालय कमचा-यामध्ये अमुलाग्र बदल घडुन येणे आवश्यक आहे.त्यांचा तांत्रिक व यांत्रिक दृष्टिकोनातुन बौध्दिक विकास होणे महत्वाचे आहे तरच आजच्या युगात टिकुन राहु शकते. आजच्या माहितीच्या गरजा वाचकापर्यत पोहचविणे शक्य होईल.

ग्रंथालये ही माहितीची अध्ययावत केंद्र आहेत अनेक नवनव्या सेवा देण्याचे कौशल्य ग्रंथालय कर्मचारी वर्गाकडे व ग्रंथपालाकडे असणे आवश्यक आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये आज गुणवत्तेचा महत्वाचा आहे. गुणवत्ता टिकविणे आवश्यक आहे सिक्स सिग्मा प्रणालीप्रमाणे ग्रंथालयानाही आपल्या सेवा कार्य व सहकार्याच्या बाबतीत अचुक राहणे आवश्यक आहे.

सिक्स सिग्माची ग्रंथालयात आवश्यकता

१) सिक्स सिग्माच्या अचुकतेप्रमाणेच ग्रंथाल्याच्या सुध्दा सेवा देता येतात.

T.C.
Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Tq.& Dist. Hingoli



PRINCIPAL
Shivaji College

58